'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 115 (B)- भारत : काल आज आणि उद्या
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# भारतीय ग्रामपंचायतीची कार्यपध्दती

सुवर्णा कडलग
एस.एम.बी.एस.टी. कॉलेज
संगमनेर जि. अ. नगर
jalindar.mhaske2011@gmail.com

डॉ. आर. डी. भोसले
एम.जी.व्ही.कला व वाणीज्य महाविदयालय
येवला जि. नाशिक
bhosaleraje70@gmail.com

**प्रस्तावना:**

वैदिक काळापासुन ग्रामपंचायत हा प्रशासनाचा एक भाग आहे. ग्रामपंचायत स्वनियंत्रित संस्था आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करताना महात्मा गांधीच्या मनात स्वयंपूर्ण आणि सहकारी ग्रामरचनेवर आधारलेले पंचायतराज स्थापन करण्याची संकल्पना मनात होती. पुढे भारताच्या राज्यघटनेची मांडणी करताना स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय राज्यसुचित समाविष्ट केला आहे. परंतु हा राज्य सरकारच्या अधिकारातील विषय आहे म्हणून राज्यशासनाने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना प्रस्थापित केली आहे. पुढे त्यातुन पंचायत राज्याच्या माध्यमातुन ग्रामीण समाजाला स्वायत्त, स्वावलंबी करणे, विविध सत्तेचे विकेंद्रीकरण करून त्याचा राजकीय सहभाग मिळवुन दिला जातो. समाज विकास योजनांना ग्रामीण व निरक्षर लोकांकडून प्रतिसाद मिळत नाही या अपयशी योजनांचा विचार करून ग्रामीण भारताच्या उत्कर्षासाठी उपाययोजना म्हणुन केंद्र शासनाने ग्रामपंचायत पर्याय निवडुन समाज विकास योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली १६ जानेवारी १९५७ रोजी पहिली समिती स्थापन केली गेली व पंचायतराज व्यवस्थेचा पाया घातला गेला.

मेहता समितीने ग्रामिण विकास व पुनर्रचनेसाठी गाव, तालुका, जिल्हा स्तरावर सत्तेचे विकेंद्रीकरण करुण लोकांना राजकिय प्रक्रियेत सामावून घेतले. भारताच्या राष्ट्रीय विकास मंडळाने (National Development Council) १२ जानेवारी १९५८ रोजी झालेल्या बैठकीत बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींना मान्यता दिली. त्याचप्रमाणे देशात सर्वप्रथम राजस्थान मध्ये सन १९५९ मध्ये पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली.

१ मे १९६० रोजी मुंबई द्विभाषीक राज्याचे विभाजन होवुन महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यानंतर देशातील विविध भागात ग्रामपंचायत संकल्पना राबविली गेली. पुढे या शिफारशींचा विचार करून 'महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत राज समिती अधिनियम १९६१' तयार केला. या अधिनियमानुसार राज्यातील पंचायत राज्याची संकल्पनेसाठी २२६ शिफारशी केल्या. त्याचे तीन विभागात विभागणी केली. त्यातील ग्रामपंचायतीसाठी स्वातंत्र्य ग्रामपंचायत, गट ग्रामपंचायती निर्मिती करावी, ग्रामपंचायतीवरील तलाठींचे हस्तक्षेप कमी करून स्वातंत्र्य करणे. पंचायत समितीने ग्रामपंचायत वाढीकडे लक्ष द्यावे. ग्रामसेवकावर, ग्रामपंचायतीवर नियंत्रण ठेवण्यास सांगितले. जमा होणाऱ्या महसुलापैकी ३० टक्के ग्रामपंचायतीला तर ७० टक्के जिल्हा परिषदेची अशा विविध शिफारशी या समितीने केल्या. महाराष्ट्र सरकारने या शिफारशी विचारात घेवुन या अधिनियमाला ५ मार्च १९६१ रोजी भारताच्या राष्ट्रपतींची संमती मिळालेली आहे. त्यासाठी स्वातंत्र्यपणे शासकीय ग्रामसेवक पदाची निर्मिती सुचविली आहे. ग्रामपंचायत विकासाचा कारभार चालविण्यासाठी महाराष्ट्रात १ मे १९६२ पासुन त्रिस्तरीय ग्रामीण पंचायत राज्यव्यवस्था सुरु झाली.